# श्रीगोंदा तालुक्यातील मंदिरांचा इतिहास

## History of The Temples in Shrigonda Tehsil

## (Abstract)

श्रीगोंदा तालुक्याला मंदिर स्थापत्याचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. सदर लघुशोध प्रकल्पातून श्रीगोंदा तालुक्यातील मंदिरांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. लघुशोध प्रकल्पाची मांडणी चार प्रकरणातून करण्यात आली असून या चार प्रकरणातून यादव काळ ते आधुनिक काळ या कालखंडात महाराष्ट्रात आणि विशेषतः श्रीगोंदा तालुक्यात मंदिर स्थापत्याला, मंदिर बांधणीला कशा प्रकारे बहर येत गेला व पुढे ही परंपरा जशीच्या तशी नव्हे परंतु स्थानिक वैशिष्टयांना सामावत पुढील काळात देखील मंदिर बांधणी श्रींगोद्यात होत राहिली. थोडक्यात यादव काळ हा जर मंदिर स्थापत्याच्या सदंर्भात समृद्धीचा मानला तर शिवपूर्वकाळ, शिवकाळ व पेशवेकाळात मंदिर बांधणीचा झरा क्षीण का होईना. पण वाहत राहिला असे दिसते.

लघुशोध प्रकल्पाचे पहिले प्रकरण हे 'प्रास्ताविक' स्वरुपाचे असून यामधून स्थानिक इतिहासलेखनाचे स्वरुप, वाटचाल व विकासाचा आढावा घेण्यात आला आहे. आधुनिक काळात इतिहासलेखन संकल्पनेमध्ये समाजाच्या सर्व घटकांचा किंवा अंगांचा विचार केला जातो. यामध्ये राजकिय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी विविध अंगांचा अभ्यास केला जातो. केवळ राजकीय घटना हा इतिहासाचा वर्ण्य विषय राहिलेला नसून गतकालीन मानवी जीवनाचे समग्र दर्शन घडविण्याचा प्रयत्न इतिहासामधून केला जातो. प्राचीन काळाचा विचार करता इतिहासाचे स्वरुप व व्याप्ती यामध्ये प्रचंड बदल झालेला दिसतो.आधुनिक काळात प्रादेशिक इतिहासाची एक पोटशाखा म्हणून स्थानिक इतिहासलेखान हा प्रकार विशेष मान्यता पावलेला आहे.प्रस्तुत प्रकरणातून महाराष्ट्रातील स्थानिक इतिहासलेखनाचा आढावा घेतला आहे.स्थानिक इतिहासलेखनाची एक मोठी परंपरा मराठीत निर्माण झाली आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून 'श्रीगोंदा

तालुक्यातील मंदिरांचा इतिहास' लिहिण्याचा प्रयत्न प्रस्तुत लघुशोध प्रकल्पातून केला आहे.

लघुशोध प्रकल्पाचे दुसरे प्रकरण 'महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्यः उदय व विकास' या शीर्षकाचे असून प्रस्तुत प्रकरणातून मंदिर स्थापत्याची सुरुवात, मंदिर स्थापत्यकलेचा विकास, मंदिर स्थापत्याच्या विविध शैली, हेमाडपंती स्थापत्य शैली, अहमदनगरमधील मंदिर स्थापत्याचा विकास इत्यादी मुद्दांचा परामर्श घेतलेला आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात देवालयांना (मंदिरांना) विशेष महत्त्वाचे स्थान आहे. मंदिरांमध्ये गावसभा भरवून न्यायनिवाडे होत असत. समाजातील अडीअडचणी, प्रश्न सोडविण्याचे ते एक महत्त्वाचे स्थळ होते.

महाराष्ट्रात दगडांत बांधलेली सर्वात आधीची मंदिरे वाकाटककालीन असून ती रामटेक (जि. नागपूर) येथे आहेत. महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या राष्टकूट आणि उत्तर कलचुरी घराण्यांच्या काळातील मंदिरांची ओळख आता अभ्यासकांना पटली आहे. यानंतर उत्तरकालीन चालुक्य, शिलाहार व यादव या राजवटींच्या काळात महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्यात फार मोठी भर पडली. यादव काळात तर महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणावर मंदिरांची बांधणी झाली. ही मंदिर स्थापत्याची शैली 'हेमाडपंती शैली' या नावाने ओळखली जाऊ लागली. स्टेला क्रॅमरिश या विदुषीने या मंदिरांना 'भूमिज शैली' असे संबोधले आहे.

भारतामध्ये जे मंदिर स्थापत्य विकसित झाले त्याच्या तीन प्रमुख शैली मानल्या जातात. नागर शैली, द्राविड शैली व वेसर शैली या त्या प्रमुख शैली होत. महाराष्ट्राच्या संदर्भात हेन्री कझिन्स, पी. सौंदरराजन, ओ. पी. वर्मा, सु. र. देशपांडे, गो. ब. देगलूरकर, प्रभाकर देव इत्यादी प्रभृतींनी मंदिर स्थापत्याच्या अभ्यासासंदर्भात मोलाची भर घातली. पुणे, नाशिक, अहमदनगर जिल्ह्यातील त्याचप्रमाणे खानदेश, विदर्भ आणि मराठवाडा भागातील निजामाच्या संस्थानातील व दक्षिण महाराष्ट्रातील त्यावेळच्या मंदिर स्थापत्याचे पहिले अभ्यासक हेन्री कझिन्स हे होत. त्यानंतर ए. व्ही. नाईक यांनी दख्खन मधील चौथ्या

शतकापासून ते अगदी चौदाव्या शतकापर्यंतच्या सर्व स्थापत्य प्रकारांचा विस्तृत आढावा घेतला.

अहमदनगर, नाशिक, पुणे या जिल्ह्यांत तसेच वऱ्हाड व निजामाच्या राज्यातील काही भागात हेमाडपंती या नावाने ओळखली जाणारी असंख्य मंदिरे आहेत. यामध्ये अहमदनगर व नाशिक हा पट्टा यादवांच्या सांस्कृतिक जीवनाचा प्रभावी प्रदेश असल्यामुळे या भागात हेमाडपंती मंदिर स्थापत्य शैलीचा प्रभाव सर्वांत जास्त दिसतो. अहमदनगर जिल्ह्यामधून वाहणाऱ्या गोदावरी, प्रवरा, मुळा या नद्यांच्या काठावर, तसेच भिमा व घोडनदी या नद्यांच्या काठावर किंवा जवळच्या परिसरात यादव काळात जास्त प्रमाणावर मंदिर बांधणी झाली. अहमदनगर जिल्ह्यामध्ये एकूण १५० इतकी हेमाडपंती किंवा भूमिज शैलीतील मंदिरे आढळतात.अहमदनगर जिल्ह्यीतल मंदिरांची संख्या लक्षात घेता अहमदनगर जिल्ह्यातील स्थापत्यकलेचा ऐतिहासिक वारसा सिद्ध होतो.

लघुशोध प्रकल्पाचे तिसरे प्रकरण हे 'श्रीगोंदा तालुक्यातील मंदिर स्थापत्य' या शीर्षकाचे असून प्रस्तुत प्रकरणातून श्रीगोंदा तालुक्यातील मंदिरांचा इतिहास विचारात घेतला आहे. श्रीगोंदा तालुक्याला मंदिर स्थापत्यकलेचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. श्रीगोंद्यामधील आर्वी मुद्गल, मांडवगण, देवदैठण यांसारख्या ठिकाणी प्राचीन काळात आश्रम होते असे उल्लेख धर्मग्रंथांमधून सापडतात. तसेच सिद्धटेक व पेडगाव (ता. श्रीगोंदा) ही क्षेत्रे देखील प्राचीन काळात महत्त्वाची तिर्थे होती. श्रीगोंदा तालुक्यामधून घोडनदी, भीमा, हंगा, सरस्वती यासारख्या मुख्य नद्या वाहतात. विशेषतः या नद्यांच्या काठी किंवा परिसरात प्राचीन काळात तीर्थक्षेत्रे होती. पुढे याच परिसरात मंदिरांची उभारणी झाली असे दिसते.

इतिहास अभ्यासाच्या सोयीसाठी याठिकाणी श्रीगोंदा तालुक्यातील मंदिरांची तीन गटात विभागणी केली आहे. पहिला गट म्हणजे यादवकालीन मंदिर शैलीतील मंदिरे यात मोडतात. संशोधकाला या परिसरात जवळजवळ पंधरा मंदिरे यादवकालीन हेमाडपंती शैलीतील आढळली. सुमारे ११ वे शतक ते १४ वे शतक या कालखंडात या मंदिरांची उभारणी झाली असे स्थापत्यशैलीच्या वैशिष्ट्यावरुन

लक्षात येते. पारंपारिक साधनांमध्ये आढळणारी वर्णने व स्थापत्य शैली यावरुन ही मंदिरे यादव कालीन आहेत हे दिसते. यादवांच्या कालखंडात अहमदनगर हा त्यांच्या राजकिय प्रभावाचे महत्त्वाचे क्षेत्र होते असे दिसते. श्रीगोंद्याचा परिसर देखील यादवांच्या तब्यात असल्यामुळे फार मोठ्या संख्येने या परिसरात यादवकालीन मंदिरांचा आढळ होतो.

दुसरा टप्पा म्हणजेच शिवपूर्वकाळ, शिवकाळ व पेशवा काळ हा होय. याकाळातील मंदिर स्थापत्याचा दुसऱ्या गटात समावेश केला आहे. इसवी सन १७५९ पर्यंत या परिसरात मंदिर स्थापत्य शैलीमध्ये विशेष अशी भर पडली नाही. मंदिर स्थापत्याच्या संदर्भात हा कालखंड प्रतिगामी स्वरुपात प्रकट होतो असे दिसते. इ. स. १७५९ मध्ये पेडगाव, जुन्नर (शिवनेरी) व अहमदनगर येथील किल्ले व परिसर पेशव्यांनी जिंकून आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे पेशवे काळात बांधलेली मंदिरे यांचा दुसऱ्या टप्प्यात/ गटात समावेश करता येईल. या काळात बांधली गेलेली मंदिरे ही संख्येच्या प्रमाणात कमी आहेत. परंतु मंदिर स्थापत्याच्या शैलीवरुन ही मंदिरे आपली वैशिष्ट्ये दाखवतात. पेशवेकालीन मंदिरांचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे दिपमाळ होय. मंदिरासमोर असलेल्या दिपमाळेवरुन व मंदिरांच्या शिखरांवरुन ही मंदिरे चटकन नजरेत भरतात.

मराठेकाळात व पेशवेकाळात महाराष्ट्रात जी मंदिरे उभारली गेली त्यांचे पुन्हा तीन गटात वर्गीकरण करता येते. पहिला गट म्हणजे यादव कालीन मंदिर शैली किंवा भूमिज शैली होय. आधीच्या मंदिर स्थापत्यात थोडासा बदल होऊन हा प्रकार निर्माण झाला. दुसरा गट म्हणजे नागर पद्धतींच्या देवालयांचा गट होय. तिसरा प्रकार म्हणजे स्थानिक मंदिर शैलीचा प्रकार होय. या प्रत्येक गटातील मंदिरांची वेगळी अशी वैशिष्टये दृष्टीस पडतात. पेशवा काळात श्रीगोंद्यामध्ये बांधले गेलेले महालक्ष्मी मंदिर हे मंदिर वैशिष्ट्यपूर्ण आहे. तर देवदैठण येथील दधीचि किंवा दधीति समाधी मंदिरे ही स्थापत्याच्या दृष्टीने अभ्यासनीय आहेत.

श्रीगोंदा तालुक्यातील मंदिर स्थापत्याचा तिसरा गट म्हणजे आधुनिक काळात बांधली गेलेली मंदिर होय. या मंदिरांच्या शैलीचा विचार करता विशिष्ट

अशा प्रकारची शैली या मंदिरांना आहे असे दिसत नाही. एकंदरीतच यादव काळ ते पेशवा काळ या दरम्यान श्रीगोंद्यामध्ये मंदिर स्थापत्याच्या संदर्भात अनेक घडामोडी घडल्या. केवळ श्रीगोंदा या तालुक्याच्या ठिकाणी (शहरामध्ये) सुमारे ११३ मंदिरे आहेत असे दिसते. यादव काळात हा प्रदेश मंदिर स्थापत्याच्या दृष्टीने संपन्न होता. उत्कृष्ट अशा दर्जाचे स्थपती व शिल्पकार या परिसरात होते. पेडगावचे लक्ष्मीनारायण मंदिर, रामेश्वर मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर, बालेश्वर मंदिर, भैरवनाथ मंदिर ही सर्व मंदिरे यादवकालीन आहेत. तसेच श्रीगोंद्यातील विठोबा मंदिर, रुक्मिणी (रखुबाई) मंदिर, हटकेश्वर मंदिर, लक्ष्मीनारायण मंदिर ही देखील हेमाडपंती शैलीतील मंदिरे आढळतात. या मंदिरांवरुन येथील मंदिर स्थापत्यशैली किती विकसित होती व हा प्रदेश यादवांच्या राजवटीचा भाग होता हे दिसते. पुढे ही परंपरा मुस्लिम राजवटींच्या काळात लोप पावली.

पेशवे काळात मात्र पुन्हा एकदा याठिकाणी स्थानिक परंपराना बरोबर घेत येथे मंदिरांची उभारणी झाली. यादव काळातील मंदिर स्थापत्यापासून पेशवे काळातील मंदिर स्थापत्याने प्रेरणा घेतली असे दिसते. यादव कालीन मंदिर स्थापत्याचे वैभव जरी पेशवे काळात लोपले असले तरी मंदिर निर्मितीची प्रेरणा तशीच टिकून होती हे दिसते. ऊरील सर्व मांडणीवरुन श्रीगोंद्यातील मंदिर स्थापत्याच्या संदर्भात पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतील.

१. प्राचीन काळापासून श्रीगोंद्याला मंदिर स्थापत्याच्या निर्मितीची परंपरा लाभलेली आहे.

२. शैलीच्या दृष्टीने विचार करता चालुक्य शैली, यादवकालीन हेमाडपंती किंवा भूमीज शैली व पेशवेकालीन शैली अशा शैलींमध्ये या मंदिरांची निर्मिती झाली.

३. यादव काळ हा श्रीगोंद्यातील मंदिर निर्मितीच्या संदर्भात महत्त्वाचा काळ होता असे दिसते. यादवकाळात सुमारे पंधरा मंदिरे श्रीगोंद्याात हेमाडपंती शैलीमध्ये निर्माण झाली.

४. यादवकालीन मंदिरे ही सुमारे इसवी सन ११ वे शतक ते १४ वे शतकया कालखंडात निर्माण झाली आहेत असे स्थापत्यशैलीवरुन लक्षात येते.

५. श्रीगोंदा तालुक्यातील १५ यादवकालीन मंदिरापैकी सर्वात जास्त मंदिरे ही

शिवाची आहेत. १५ पैकी ९ मंदिरे ही शिव किंवा महादेवाची आहेत.

६. पंधरा मंदिरांपैकी दोन मंदिरे ही लक्ष्मी नारायणाची आहेत. तर भैरोबा किंवा भैरवनाथ, खंडोबा या देवांची अनुक्रमे एक- एक मंदिरे आहेत. हे देखील शिवाचेच अवतार आहेत असे मानले जाते.

७. श्रीगोंद्यामध्ये यादवकालीन हेमाडपंती किवा भूमिज शैलीतील विठोबा व रुक्मिणी (रखुमाई) यांची अनुक्रमे एक एक मंदिरे सरस्वती नदीच्या परिसरात आहेत. यावरुन यादवकाळात शिवाबरोबरच विठ्ठल (विठोबा) व रुक्मिणी (रखुमाई) या वारकरी संप्रदायाच्या आराध्य देव-देवता देखील पूजनीय होत्या असे दिसते.

८. यादवकालीन मंदिरांची संख्या, मंदिरांची रचना, मंदिरांवरील शिल्पाकृती यावरुन श्रीगोंदा व आजूबाजूच्या परिसरात उत्तम दर्जाचे स्थपती व कलाकार अस्तित्त्वात होते. तसेच मंदिर स्थापत्यासाठी आवश्यक असणारा दगड देखील या परिसरात मुबलक प्रमाणात उपलब्ध होता असे दिसते.

९. यादवकाळात बांधली गेलेली मंदिरे ही विशेषतः सरस्वती नदी व भीमा नदीच्या किनाऱ्यावर किवा परिसरामध्ये जास्त संख्येने बांधली गेली. यावरुन श्रीगोंदा, पेडगाव, लिपंणगाव, ढोरजे, मांडवगण यांसारख्या ठिकाणांचे प्राचीन काळातील धार्मिक महत्त्व देखील अधोरेखित होते.

१०. शिवाची ९ मंदिरे येथे असून यादवकालीन मंदिरांपैकी जवळजवळ ६०%मंदिरें

ही शिवाची आहेत. यावरुन यादवकाळात शिव ही देवता अधिक लोकप्रिय होती असे दिसते. त्याखालोखाल विष्णू या देवतेची मंदिरे देखील श्रीगोंद्यात

आढळतात. म्हणजेच शिव व विष्णू या दोनही देवता या काळात पूजनीय होत्या

व त्यांच्यामध्ये संघर्ष नव्हता हे सिद्ध होते.

११. यादव काळानंतर पेशवे काळापर्यंत संख्येच्या व शैलीच्या दृष्टीने मंदिर स्थापत्यात विशेष भर पडली नाही हे देखील लक्षात येते.

१२.पेशवे काळात पुन्हा एकदा श्रीगोंद्यातील मंदिर स्थापत्यामध्ये महत्त्वपूर्ण भर पडलेली दिसते. श्रीगोंद्याचे महालक्ष्मी मंदिर व देवदैठणचे दधीचि किंवा दधीति समाधी मंदिर यांसारख्या मंदिरांवरुन पेशवेकालीन स्थापत्यशैलीची प्रचिती येते. यादव कालखंडानंतर क्षीण झालेली परंपरा पुन्हा एकदा स्थानिकतेचे संदर्भ घेऊन पेशवेकाळात उदयास आलेली दिसते. यादवकालीन मंदिरे व पेशवेकालीन मंदिरे यामधील फरक लगेचच लक्षात येतो.

१३. पेशवे काळानंतर मंदिरांच्या संख्येमध्ये जरी वाढ झाली असली तरी शैलीच्या दृष्टीने विचार करता आधीच्या शैलींमध्ये स्थानिक अविष्कार घडलेले दिसून येतात. संख्येच्या दृष्टीने मंदिरांमध्ये जरी भर पडत असली तरी शैलीच्या दृष्टीने काही ठळक वैशिष्टये नजरेस भरत नाहीत.

१४. श्रीगोंद्यामध्ये यादवकाळापासून सुरु झालेली मंदिर निर्मितीची प्रक्रिया क्षीण स्वरुपात का होईना पेशवेकाळात टिकून होती असे दिसते.